नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४८ Issue - 348 | वार सोमवार दि. ११ मे २०२६ Blow- Monday Date 11 May 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# एकजूट होऊन आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत

## पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करा, भारताकडे मोठ्या तेल विहिरी नाहीत, आज वर्क फ्रॉम होम सारख्या उपाययोजनांची गरज : पीएम मोदी

हैदराबाद : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर कमी केला पाहिजे. शेजारील देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती अनेक पटींनी वाढल्या आहेत. पंतप्रधान हैदराबादमध्ये म्हणाले की, आपल्याकडे मोठ्या तेल विहिरी नसल्यामुळे या जागतिक संकटाचा भारतावर अधिक परिणाम होत आहे. ते म्हणाले की, ज्या शहरांमध्ये मेट्रो आहे, तिथे लोकांनी तिचा वापर करावा. आज आपल्याला बैठकांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि वर्क फ्रॉम होमसारख्या उपायांची गरज आहे.

पश्चिम आशियाई संघर्षाच्या परिणामाचा संदर्भ देत नरेंद्र मोदी म्हणाले की, जेव्हा पुरवठा साखळी सतत संकटात असते, तेव्हा कितीही उपाययोजना केल्या तरी अडचणी वाढतच जातात. त्यामुळे, देश आणि भारतमातेला सर्वोच्च स्थानी ठेवून आपण आता एकजुटीने लढा दिला पाहिजे. ते म्हणाले की, देशभक्ती म्हणजे केवळ देशासाठी प्राण देणे नव्हे. देशासाठी जगणे आणि आपली कर्तव्ये पार पाडणे ही सुद्धा देशभक्तीच आहे. पंतप्रधानांनी हैदराबादमधील भाजपच्या सभेत ही टिप्पणी केली. यापूर्वी आज बंगळूरमध्ये त्यांनी म्हटले होते की, काँग्रेसने डीएमकेच्या पाठीत खंजीर खुपसला. आजच्या काळात पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर अत्यंत संयमाने केला पाहिजे. आपण आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ गरजेनुसारच केला पाहिजे. देशाने कोविड-१९ महामारीच्या काळात वर्क-फ्रॉम-होम प्रणाली विकसित केली. काळाची गरज अशी आहे की, ही प्रणाली पुन्हा सुरू करणे देशाच्या हिताचे ठरेल.

७५ वर्षांनंतर भाजप सरकारने आसाममध्ये हॅट-ट्रिक साधली आहे. पुदुचेरीमध्येही भाजप-एनडीए सरकार पुन्हा सत्तेवर आले आहे. या विजयानंतर तेलंगणातील लोकांच्या भावनाही मला दिसत आहेत.

नरेंद्र मोदी यांची देशवासियांना उद्देशून केलेली नऊ आवाहने

१ पेट्रोल डिझेलचा वापर जपून करा कारण दर खूप वाढले आहेत

२ खाद्यतेलाचा वापर मर्यादित जपून करा

३ पुढील एक वर्ष सोनं खरेदी करू नका

४ वर्षभर परदेशी प्रवास टाळा

५ कच्च तेल वाचवण्यावर भर द्यायचा आहे

६ परकीय चलन वाचवण्यावर भर द्यायचा आहे, परकीय चलन साठा आपल्याला कमी होऊ द्यायचा नाही

७ जास्तीत जास्त मेट्रोने प्रवास करा, इलेक्ट्रिक वाहनाने प्रवास करा

८ वर्क फ्रॉम होम वर भर द्या, ऑनलाईन बैठकांवर भर द्या

९ परकीय उत्पादनांची खरेदी कमी करा



नवीकरणीय आणि पर्यायी ऊर्जा क्षेत्रात भारत पुढे वाटचाल करतोय

जेव्हा अमेरिका-इराण युद्धामुळे भारत ऊर्जा संकटाचा सामना करत आहे त्यावेळी पंतप्रधानांनी महत्वपूर्ण वक्तव्य केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी असेही म्हणाले की, नवीकरणीय आणि पर्यायी ऊर्जा क्षेत्रात भारत वेगाने प्रगती करत आहे. सौर ऊर्जा उत्पादनात भारत जगातील अव्वल देशांपैकी एक बनला आहे. इतकेच नाही, तर पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाला प्रोत्साहन देऊन आयात इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यात अभूतपूर्व प्रगती झाली आहे.

पंतप्रधान मोदींनी दिला ऊर्जा धोरणावर भर

ऊर्जा धोरणावर भर देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, प्रत्येक घराला एलपीजी पुरवणे हे सरकारचे पहिले उद्दिष्ट होते आणि आता परवडणाऱ्या पाईप गॅसचा (पी-एनजी) पुरवठा वाढवण्यासाठी वेगाने काम सुरू आहे. केंद्र सरकार ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता आणण्यासाठी सीएनजी-आधारित परिसंस्थेलाही सक्रियपणे प्रोत्साहन देत आहे.

तेलंगणामध्ये ९३७७ कोटींच्या प्रकल्पांचे उद्घाटन

तेलंगणामध्ये ९३७७ कोटींच्या प्रकल्पांचे उद्घाटन केले. आज भारत सुधारणा एक्सप्रेसवर पुढे जात आहे आणि आधुनिक पायाभूत सुविधा वेगाने उभारत आहे. पंतप्रधान मोदींनी उद्घाटन केलेल्या प्रकल्पांमध्ये हैदराबाद-पणजी आर्थिक कॉरिडॉरवरील गुडेबेलूर ते महबूबनगर पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग १६७ चे चौपदरीकरण आणि संगारेड्डी जिल्ह्यातील जहीराबाद औद्योगिक क्षेत्राचा विकास यांचा समावेश आहे.


याव्यतिरिक्त, त्यांनी इतर अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन केले, ज्यात काझीपेट-विजयवाडा रेल्वे मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पाचे काही भाग, हैदराबादमधील ग्रीनफिल्ड पेट्रोलियम, तेल आणि वंगण (पीओएल) टर्मिनल, काझीपेट रेल्वे अंडर-रेल बायपास आणि वारंगलमधील पीएम मित्र पार्क, जे काकतीय मेगा टेक्सटाईल पार्क म्हणूनही आ-ळखले जाते, यांचा समावेश आहे.

## हिमंता सरमा आसामचे, रंगास्वामी पुदुच्चेरीचे सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होणार, शपथविधीच्या तारखा जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीनंतर पश्चिम बंगालमध्ये शनिवार नऊ मे रोजी भाजपने सरकार स्थापन केले आहे. शुभेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. तर आज म्हणजेच रविवार १० मे रोजी तामिळनाडूत टीव्हीके पक्षाचे सर्वोच्च नेते थलपती विजय उर्फ चंद्रशेखरन जोसेफ विजय यांनी पहिल्यांदाच मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. आता मंगळवार १२ मे रोजी आसाम आणि १३ मे रोजी पुदुच्चेरीत शपथविधी होणार आहे.





आसाममध्ये भाजपने हॅटट्रिक केली आहे. भाजपच्या नेतृत्वात पहिल्यांदा आसाममध्ये सत्ता स्थापन झाली त्यावेळी सर्बानंद सोनोवाल यांनी सरकारचे नेतृत्व केले. यानंतर भाजपच्या दुसर्या कार्यकाळात (टर्म) हिमंता बिस्वा सरमा यांनी सरकारचे नेतृत्व केले. आता सलग दुसऱ्यांदा ते आसामचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. सरमा सरकारचा शपथविधी मंगळवार १२ मे रोजी होणार आहे.

पुदुच्चेरीत एनडीएचीच सत्ता सलग दुसऱ्यांदा आली आहे. एन. रंगास्वामी यांच्या नेतृत्वात भाजपची युती पुन्हा सत्तेत आली आहे. रंगास्वामी १३ मे रोजी सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

केरळमध्ये मुख्यमंत्री कोण होणार यावरून पेच निर्माण झाला आहे. काँग्रेस पक्ष हा गंभीर प्रश्न सोडवण्यात गुंतला आहे. यामुळे विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन आठवडा उलटला तरी केरळमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी ठोस हालचाल झालेली नाही. मागील पाच वर्षांपासून विरोधी पक्षनेते म्हणून यूडीएफचे नेतृत्व करणाऱ्या व्ही. डी. सतीशन यांच्याकडे काही आमदारांचा पाठिंबा आहे. के. सी. वेणुगोपाल हे एआयसीसी सरचिटणीस आणि राहुल गांधींचे निकटवर्तीय आहेत, त्यांनाही काही आमदारांचा पाठिंबा आहे. तर रमेश चेन्निथला हे माजी विरोधी पक्षनेते आणि अनुभवी नेते म्हणून ओळखले जातात आणि त्यांच्या नावालाही निवडक आमदारांचा पाठिंबा आहे. यामुळे केरळमध्ये व्ही. डी. सतीशन, के. सी. वेणुगोपाल आणि रमेश चेन्निथला यांच्यापैकी कोण मुख्यमंत्री होणार यावरून चर्चेला उधाण आहे.

### शासनाकडून कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांतर्गत दीड हजार कोटीचे करार

## ‘लँड टायटलिंग अ‍ॅक्ट’ जुलैमध्ये लागू होणार; महाराष्ट्र ठरणार देशातील पहिले राज्य : मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : ‘लँड टायटलिंग क्ट’ येत्या जुलै महिन्यात राज्यात लागू होणार असून असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या कायद्यामुळे राज्यातील १४ कोटी जनतेची मालमत्ता ही निश्चित प्रॉपर्टी म्हणून गणली जाणार असून जगातील कुठल्याही देशात ती कॅश करता येईल, असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

भारती विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आमदार भीमराव तापकीर, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई, कुलगुरू डॉ. विवेक साळवी यांच्यासह विद्यापीठाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले, स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी शिक्षण क्षेत्रात उभारलेले कार्य हे महाराष्ट्राच्या अभिमानाचे प्रतीक आहे. ‘गल्लीतली शाळा’ ते भारती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प केला आणि तो पूर्ण करून दाखवला. त्यांच्या विचारांचा प्रकाश आज देश-विदेशात पोहोचत आहे.

ते म्हणाले, शिक्षणाशिवाय विकसित भारताची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) धोरण राबवून दीड हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत. तसेच दीड लाख विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय) तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण




देण्यास सुरुवात केली आहे. आगामी काळात विद्यापीठांनी तंत्रज्ञान आणि ए.आय. स्वीकारणे अत्यावश्यक आहे.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रांसाठी कोणत्याही स्टॅम्प पेपरची आवश्यकता राहिलेली नसून विविध प्रमाणपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान’ अंतर्गत राज्यातील ३० लाख विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक कागदपत्रे मोफत पोहोचविण्याची व्यवस्था उभी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन हीच छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा असल्याचे सांगत सरकारने समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, असेही ते म्हणाले. नागपूर येथे भारती विद्यापीठाचा विस्तार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी आवश्यक जागा व शासनस्तरीय सहकार्य देण्याची ग्वाही दिली. तसेच ‘टिटबिट पॉलिसी’च्या माध्यमातून अडचणीत असलेल्या भूखंडांचा मार्ग काढण्याबाबतही सकारात्मक भूमिका मांडली.

यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शिक्षणानेच माणसाची प्रगती होऊ शकते हा संदेश देत पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची चळवळ उभी केली. त्याच ध्येयाने स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण क्षेत्रात वटवृक्ष उभा केला. एका छोट्या खोलीत सुरू झालेल्या शाळेचे आज जागतिक पातळीवरील विद्यापीठात रूपांतर झाले असून हे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी शिक्षणासोबत संस्कार, राष्ट्रभक्ती आणि शिस्तही महत्त्वाची असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण, सैनिक प्रशिक्षण, विद्यार्थिनींसाठी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण, शाळांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे यांसारख्या उपक्रमांवर शासन भर देत असल्याचे त्यांनी सांगितले.

### आकाशात उजळला महामानवाच्या तेजाचा प्रकाश; ड्रोनच्या भव्य रोषणाईतून मानवंदना

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळेच सर्वसमावेशक विकास शक्य : मंत्री संजय शिरसाट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या देशाच्या प्रगतीचे शिल्पकार आहेत. शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व त्यांनी समाजाला पटवून दिले, त्यांच्या विचारांचा प्रभाव प्रत्येकाच्या जीवनात जाणवतो. समाजातील पुढील पिढ्यांपर्यंत बाबासाहेबांचा विचार पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. त्यांनी दिलेल्या संविधानामुळेच सर्वसमावेशक विकास शक्य असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवानिमित्त शिवाजी पार्क दादर येथे प्रथमच ड्रोन शो व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, आमदार सर्वश्री अमित साटम, योगेश सागर, प्रसाद लाड, कॅप्टन आर. तमिळ सेल्वन, महापौर रितू तावडे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, सिद्धिविनायक न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर, भन्ते डॉ.राहुल बोधी महाथेरो व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

मंत्री शिरसाट यांनी, डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भरविण्यात येणाऱ्या पुस्तक प्रदर्शनांचा विशेष उल्लेख करत, बाबासाहेबांचे विचार समजून घेणे आणि आत्मसात करण्यासाठी वाचनाची सवय जोपासावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ. आंबेडकर यांच्या जयंती आणि महापरिनिर्वाण दिनी लाखो अनुयायी एकत्र येऊन अभिवादन करतात, ही त्यांच्या कार्याची खरी पोचपावती असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला दया, क्षमा आणि शांतीचे मूल्य दिले. समानता, समान संधी आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारित त्यांचा विचार आजही मार्गदर्शक ठरत आहे. त्यांच्या विचारांवर चालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या यशाची गुरुकिल्ली त्यांच्या तत्त्वज्ञानातच दडलेली आहे. भारतीय संविधान हे जगासाठी मार्गदर्शक ठरणारे असून, त्यावर उभारलेली लोकशाही व्यवस्था, प्रशासकीय यंत्रणा आणि राजकीय व्यवस्था ही समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविण्याचे काम करत आहे.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान व त्यांच्या विचारांमुळेच समाजातील सर्व घटकांना समान हक्क आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे. ड्रोन शो या अभिनव उपक्रमांतून नागरिकांना आकाशात त्यांच्या कार्याचे नेत्रदीपक दर्शन घडले. त्यांच्या विचारांचा जागर देशभरासह जागतिक स्तरावर होत असून, अशा अभिनव उपक्रमांतून नव्या पिढीपर्यंत त्यांचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या ड्रोन शोद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन करण्यात आले. सुमारे २००० ड्रोनच्या सहाय्याने आकाशात साकारण्यात आलेली प्रकाशचित्रे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या प्रकाशचित्रांमध्ये डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पे प्रभावीपणे उलगडण्यात आले. तसेच भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित करणारी विलोभनीय दृश्ये साकारण्यात आली. महामानवाने घडविलेल्या सामाजिक क्रांतीचा प्रेरणादायी प्रवासही या ड्रोन शोमधून जिवंत करण्यात आला.

यावेळी गायिका वैशाली माडे यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## संपादकीय....

### चर्चांना उधाण

पश्चिम आशियात अमेरिका आणि इस्रायलने इराण विरोधात सुरू केलेल्या युद्धामुळे तसेच मागील दोन वर्षांपासून सुरू असलेल्या रशिया - युक्रेन लढाईमुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाले आहेत. या जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना बचतीचे आवाहन केले आहे. देशाचे परकीय चलन वाचवण्यासाठी पुढील वर्षभर घरात कोणतेही कार्यक्रम असले तरी सोने खरेदी करू नका, अशी कळकळीची विनंती पंतप्रधानांनी केली आहे. तेलंगणा येथील एका सार्वजनिक कार्यक्रमात बोलताना पंतप्रधानांनी देशाच्या आर्थिक सुरक्षेवर भाष्य केले. पूर्वी जेव्हा देशावर संकट यायचे, तेव्हा लोक आपले सोने दान करायचे. आज मी तुम्हाला दान मागत नाही, पण देशहितासाठी पुढील एक वर्ष सोने खरेदी टाळा, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी नागरिकांना केले. पंतप्रधानांनी यावेळी भारताच्या आयातीवर होणाऱ्या परिणामांची माहिती दिली. भारताकडे इंधनाच्या मोठ्या विहिरी नाहीत. आपल्याला पेट्रोल आणि डिझेलसाठी इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. युद्धामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. अशा स्थितीत देशाला इंधन आणि खतांची आयात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलनाची गरज लागते. सोने खरेदी कमी केल्यास हे चलन वाचवता येईल आणि त्याचा उपयोग देशाच्या इतर गरजा पूर्ण करण्यासाठी होईल, असे मोदींनी सांगितले. जागतिक स्तरावर पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले की, जगात खतांच्या एका गोणीची किंमत सुमारे ३ हजार रुपये असताना, केंद्र सरकार भारतीय शेतकऱ्यांना ती केवळ ३०० रुपयांत उपलब्ध करून देत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून वाढत्या महागाईचे सर्व ओझे सरकार आपल्या खांद्यावर उचलत आहे, जेणेकरून सामान्य जनतेला त्रास होऊ नये. मात्र, पुरवठा साखळीवर दबाव वाढल्यास अडचणी वाढू शकतात, त्यामुळे नागरिकांनीही आपला सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.

# कळसारोहण सोहळ्यास गोगावच्या सरपंच वनिता सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : फुरसुंगी (पुणे) येथे शिवा स्वयंभू नंदीश्वर मंदिर व महात्मा बसवेश्वर अनुभव मंटप चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवलिंग प्राणप्रतिष्ठापना व भव्य कळसारोहण सोहळ्याला गोगावच्या सरपंच तथा सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रच्या सोलापूर जिल्हा समन्वयक सौ. वनिता मधुकर सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



या प्रसंगी अक्कलकोटचे आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी यांना सोलापुरात महसूल मंत्री बावनकुळे साहेब यांचा दौरा लागल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या सौ. वनिता मधुकर सुरवसे यांनी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या शुभेच्छा उपस्थित भाविकांपर्यंत पोहोचवल्या.

या धार्मिक व सामाजिक सोहळ्यात उपस्थित राहून सौ. सुरवसे यांनी मंदिराच्या उभारणीसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या श्री शैलेश जकापुरे व सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सेवाभावी व्यक्तींचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी सांगितले की, अशा धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांमुळे समाजात अध्यात्म, संस्कार, एकोपा आणि सकारात्मक विचारांची जोपासना होते.

प्रमुख उपस्थित म्हणून बोलताना सौ. सुरवसे यांनी उपस्थित भाविकांना भावनिक आवाहन करताना म्हटले की, मंदिर हे केवळ श्रद्धेचे स्थान नसून ते समाजाला एकत्र बांधणारे संस्कारकेंद्र आहे. अशा पवित्र कार्यात प्रत्येकाने तन, मन आणि धनाने सहभागी होऊन समाजहितासाठी योगदान द्यावे. त्यांच्या या प्रेरणादायी विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच त्यांनी सर्व भाविकांना व नागरिकांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आणि या भव्य कार्यक्रमासाठी सन्मानपूर्वक निमंत्रण दिल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. याप्रसंगी श्री राजशेखर महास्वामीजी नंदगाव यांच्या हस्ते सौ.वनिता सुरवसे यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी श्री शैलेश जकापुरे, मधुकर सुरवसे, वीरूशेठ हारकुड, कल्याणी मंठाळे, रवि गुलगोंडा,पंडित जकापुरेशरणय्या स्वामी, काशिनाथ प्रचंडे, निळकंठ हिली, नंदू कुंभार, तानाजी खुशेकर, चनमल पाटील,निळकंठ मगलीकर, विवेक शेकापुरे,प्रश्नात हतेयांच्यासह विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, भाविक, समस्त सोलापूरकर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

# पालखेड वि.का.संस्थेच्या चेअरमनपदी रंजनामाई थेटे तर उपसभापतीपदी बाबासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : पालखेड विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी निफाड पंचायत समितीच्या माजी सदस्या तथा पिंपळगाव ब बाजार समितीच्या माजी संचालिका रंजनामाई भाऊसाहेब थेटे यांची तर उपसभापतीपदी रासाकाचे माजी व्हा.चेअरमन तथा पिंपळगाव ब बाजार समितीचे माजी संचालक बाबासाहेब शंकरराव शिंदे बिनविरोध निवड करण्यात आली.

आवर्तनानुसार मावळते चेअरमन ज्ञानेश्वर जाधव व उपसभापती असलेले अंबादास कोकाटे यांनी आपल्या पदांचे राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागांवर निवडणूक निर्णय अधिकारी दत्तात्रय नाईकरे तर सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी माधव पगारे यांनी संचालक मंडळाची निफाडच्या सहाय्यक निबंधक कार्यालयात निवडसभा बोलाविण्यात आली होती.याप्रसंगी चेअरमनपदासाठी रंजनामाई थेटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला त्यावर सुचक म्हणुन ज्ञानेश्वर जयराम जाधव यांनी तर उपसभापतीपदी बाबासाहेब शंकरराव शिंदे यांना सुचक बाळासाहेब बंडु थेटे यांनी स्वाक्षरी केली. दिलेल्या विहित मुदतीत चेअरमन,व्हा. चेअरमन पदांकरीता एकच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने संस्थेच्या चेअरमनपदी सौ. रंजनामाई भाऊसाहेब थेटे तर व्हा.चेअरमनपदी बाबासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी नाईकरे यांनी जाहीर केले.यावेळी कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत आनंदोत्सव साजरा केला.

> **ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत विविध संस्थांमध्ये कामकाज केले असून संस्था व गावहितासाठी सर्वांना सोबत घेऊन समाजकारण- राजकारण केल्याची पावती म्हणुन आज सर्व संचालक,जेष्ठ नागरीक,सभासद व नागरीकांनी माझ्यावर जो विश्वास दाखवत चेअरमनपदाची संधी दिली त्याबद्दल सर्वांचे आभार मानते. यापुढेही सर्वांना सोबत घेऊन संस्था व सभासद हितासाठी कामकाज करेन.**
>
> **– सौ.रंजनामाई थेटे**
>
> **नवनिर्वाचित चेअरमन,पालखेड सोसायटी**

याप्रसंगी संचालक बाळासाहेब थेटे, ज्ञानेश्वर जाधव, रावसाहेब शिंदे, विलास थेटे, बाबाजी आहेर, ज्ञानेश्वर आहेर, दशरथ जगझाप, अंबादास कोकाटे, सौ आश्विनी आहेर, पंडित आहेर, हेमंत थेटे यांसह पोपटराव चौधरी, सुकदेव थेटे, श्रीधर जाधव, अनिल मेधने आदिंसह रमेश शिंदे, संकेत डोखळे, भाऊसाहेब थेटे, भाऊसाहेब शिंदे, बाळनाना आहेर, संजय शिंदे, शरद जाधव, श्रीधर जाधव, केशव शिंदे, संजय थेटे, गणेश महाले, सतिष थेटे, पवन जाधव, भगवान थेटे, प्रमोद मतसागर आदींसह




ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचितांचे आमदार दिलीप बनकर माजी आमदार अनिल कदम, तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे आदिंनी अभिनंदन केले आहे.

# पडघ्यातील आर. के. पालवी व टी.ए. पाटील इंग्रजी शाळेचा दहावीचा १०० टक्के निकाल

**शारदा विद्यालयाचा ८७.०१ टक्के निकाल**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच पडघा परिसरातील विविध शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इंग्रजी माध्यमातील आर.के. पालवी इंग्रजी शाळा आणि टी.ए. पाटील इंग्रजी शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक गुणवत्तेची छाप पाडली आहे. तर मराठी माध्यमातील शारदा विद्यालयाने ८७.०१ टक्के निकाल मिळवत यशाची नोंद केली आहे.

पडघा परिसरातील मराठी माध्यमाच्या शारदा विद्यालयात यावर्षी २०८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा




एकूण निकाल ८७.०१ टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे शिक्षक, पालक आणि व्यवस्थापनामध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या विद्यालयात पूर्वा माळी हिने ९१.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तन्मय थोरात याने ९०.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर वेदांत शेलार याने ९०.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण परिश्रम असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

आर.के. पालवी इंग्रजी शाळेने यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत १०० टक्के निकाल नोंदविला. शाळेतील रुद्र अविनाश पाटील याने ९६.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. मंथन राजेश पाटील याने ९५.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर पूर्वा किशोर रोकडे हिने ९५ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळविल्याची भावना शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केली. शिक्षणाबाबतची निष्ठा, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र पालवी यांचे मोलाचे सहकार्य यामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे भिवंडी, शहापूर आणि मुरबाड या तीन तालुक्यांमध्ये आर.के. पालवी इंग्रजी शाळेने गुणवत्तेच्या बाबतीत अव्वल स्थान मिळविल्याचा दावा शाळा व्यवस्थापनाने केला आहे.

दरम्यान, पडघ्यातील टी.ए. पाटील इंग्रजी शाळेचाही निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेतील स्नेहा श्याम नवलखेरे हिने ९२.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. धनश्री शशिकांत भोईर हिने ९२.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. तर गीता चोपाराम चौधरी आणि श्रेयश आनंदराव मोरे यांनी प्रत्येकी ९०.६० टक्के गुण मिळवत संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक मिळविला. तसेच बी.बी. पाटील कुरुंद इंग्रजी शाळेचा निकाल ९६ टक्के लागला असून गिरिश्मा रवींद्र जाधव हिने ८८ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक मिळविला आहे. ग्रामीण विकास संस्थेचे आदर्श विद्यालय कुरुंद या माध्यमिक शाळेचा ९४.८०% लागला असून कु. भूमिका परेश विशे - ९१.४०% प्रथम क्रमांक, कु. सृष्टी शरद घरत - ९१.२०% दुसरा क्रमांक, कु. धनश्री मगन विशे - ८७% तृतीय क्रमांक मिळवला आहे. पडघा परिसरातील विविध शाळांनी मिळविलेल्या या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून गुणवंत विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# निफाड इंग्लिश स्कूलचा ७०.९६'/.निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत असणाऱ्या माध्यमिक विभागाचा निकाल घोषित झाला असून निफाड इंग्लिश स्कूलचा निकाल ७०.९६ % लागला आहे यामध्ये

**निफाड इंग्लिश स्कूलमध्ये अमन बाळू सानप प्रथम**

प्रथम पाच क्रमांक

१)सानप अमन बाळू ८७.८० %

२).निऱ्हाळी शाहू सचिन ८५.२० %

३).शेख जिनत इकबाल ८१.४० %

४)बागडे ओमाक्षी शेखर ८० %

५) साटोटे सोनल संजय ७६.२० %

याप्रमाणे लागला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष .प्रकाशजी वैशंपायन , उपाध्यक्ष .प्रभाकर कुलकर्णी, सेक्रेटरी हेमंत बरकले स्कूल कमिटी चेअरमन अँड.प्रविण ठाकरे ग.कौ. सदस्य व सरस्वती विद्यालयाचे चेअरमन .नंदलालजी चोरडीया ,सौ.ज्योती बागडे, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी तसेच सर्व संस्था व शाळा पदाधिकारी यांनी सर्व विद्यार्थिनींचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**राधा घोडके हिने ९७.४०% गुण घेऊन केंद्रात प्रथम येण्याचा मान पटकाविला**

# नळदुर्ग येथील डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी परंपरा कायम राखली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथील डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी १००% विजयाची परंपरा कायम राखल्याने सर्व स्तरातून विद्यार्थी व शिक्षकांचे तोंड भरून कौतुक करण्यात येत आहे

नळदुर्ग येथील डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सलग सहाव्या वर्षी सुद्धा विजयाची परंपरा कायम राखत नळदुर्गच्या केंद्रामध्ये राधा संतोष घोडके हिने ९७ . ४० % टक्के गुण घेऊन प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे यामध्ये ९१ ते ९७ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या सहा विद्यार्थ्यां सह शंभर टक्के निकालांची परंपरा कायम राखली आहे याबद्दल डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मिडियम स्कूलचे संस्थापक तथा नगरसेवक मारुती खारवे मुख्याध्यापक कविता पाटील व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक अभिनंदन केले आहे

डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी खूप प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाच्या समूहात दाखल झाले यामधून डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल च्या वतीने प्रामाणिकपणाचे दर्शन देत शैक्षणिक क्षेत्रामध्ये पारदर्शकता निर्माण करणे हा त्यांचा ध्येय असल्यामुळे सदरील विद्यार्थी हे शंभर टक्के उत्तीर्ण झाले आहे त्यामुळे त्यांचा सलग सहाव्यांदा केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळाला




आहे याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे पालक वर्गातून अभिनंदन व कौतुक होत आहे .

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर मंदिर समितीच्या मनमानी कारभाराचं आणखी एक उदाहरण; लाखो रुपयांचं फर्निचर केलं उद्ध्वस्त

## समाजसेवक गणेश अंकुशराव यांनी केली पोलखोल





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती चा कारभार हा मनमानी पद्धतीने चाललेला आहे. यासंदर्भात पंढरपुरातील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी वारंवार वेग-वेगळी प्रकरणे पुराव्यानिशी दाखवून मंदिरे समितीच्या कारभा-यांचा बोगस आणि मनमानी कारभार चव्हाट्यावर आणला होता.

आता मंदिरे समितीचा पुन्हा एक नवीनच मनमानी पद्धतीने केलेला नवा कारनामा समोर आणत गणेश अंकुशराव यांनी आणखी एक पोलखोल केली आहे.

श्रीविठ्ठल मंदिरातील सभामंडपा लगत असलेल्या एका बाजुला तत्कालीन व्यवस्थापकांसाठी पन्नास लाख रूपये खर्चून बनवलेलं सागवानी केबीन आता मंदिरे समितीकडून उध्दवस्त केलं आहे. आज गणेश अंकुशराव हे संबंधित ठिकाणी कार्यकर्त्यांसह गेले व याची पाहणी केली. यावेळी मंदिर समितीच्या मनमानी कारभाराविरूध्द जोरदार घोषणाबाजी ही करण्यात आली.

एका भाविकाकडून देणगी स्वरूपात मिळालेल्या निधीतून यासाठीचा सर्व खर्च करण्यात आला होता, परंतु कोणतेही कारण अथवा सबब जाहीर न करता कोणतीही प्रशासकीय परवानगी अथवा ठराव न करता हे केबीन फर्निचरसह उध्दवस्त करण्यात आले आहे.

हे केबीन उभारण्यासाठी ज्या भाविकाच्या देणगीचा पैसा वापरला गेला त्या देणगीदार भाविकाचे नाव मंदिरे समिती प्रशासनाने जाहीर करावं, हे काम करताना व पुन्हा ते काढून टाकताना मंदिरे समितीने कोणते ठराव केले आ-हेत का? ते ही जाहीर करावं, अशा पध्दतीने मंदिरे समितीला भाविकांकडून देणगी स्वरूपात मिळालेल्या लाखो रूपयांची उधळपट्टी करण्याचे अधिकार मंदिरे समितीच्या कारभा-यांना कुणी दिले? असे प्रश्न उपस्थित करत गणेश अंकुशराव यांनी हा मनमानी कारभार व भाविकांच्या भावनांशी चालवलेला हा खेळ आजिबात खपवून घेतला जाणार नाही, याची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, ही मंदिरे समितीच बरखास्त करावी अशी मागणी केली आहे.

जर आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर आगामी काळात पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते पंढरीत होणार असलेल्या दर्शन मंडप भुमिपुजन कार्यक्रमादरम्यान आम्ही तीव्र आंदोलन करू, हा कार्यक्रम रोखू व यावेळी जर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर यासाठी सर्वस्वी मंदिर समिती प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

## श्री क्षेत्र नरसोबावाडी येथे भाविकांची वाढती गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : श्री क्षेत्र नरसोबावाडी तालुका शिरोळ येथे सध्या भाविक भक्तांची मोठी गर्दी होत असून परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला आहे. सुट्टीचा कालावधी तसेच धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर राज्यासह परराज्यातून हजारो भाविक दर्शनासाठी दाखल होत आहेत.

श्री दत्त मंदिरात पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लागलेल्या दिसून येत आहेत. मंदिर परिसरात दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा या नामघोषाने वातावरण भारावून गेले आहे. अनेक भाविकांनी कुटुंबासह येत पूजा-अर्चा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

भाविकांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक प्रशासन, मंदिर समिती व पोलीस प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. वाहतूक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

स्थानिक व्यावसायिकांनाही या गर्दीमुळे मोठा दिलासा मिळाला असून फुलविक्रेते, प्रसाद विक्रेते व लहान व्यावसायिकांची उलाढाल वाढली आहे.

नरसोबावाडी परिसरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी दिवसांत भाविकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात.

## ॲड. संदीप कागदे यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संविधानिक स्वरूप या विषयावर व्याख्यान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या वतीने तिसरे राष्ट्रीय महादेवी असेना पणजी गोवा येथील कला अकादमी येथे चार मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आले होते व ह्या महा अधिवेशनाचे उद्घाटन गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले अधिवेशनाच्या सत्रात विविध वैचारिक विचार व चर्चा झाली.

अँड संदीप काकडे यांनी भारतीय राज्यघटना मूलभूत अधिकार अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या वरील निर्बंध वैयक्तिक जीवनाचा अधिकार यासह अभिव्यक्ती स्वातंत्र्य संबंधितातील विविध संविधानिक बाबी याबाबतीत सखोल व अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

रवी अँड संदीप गागरे यांना सन्मानचिन्ह व शाल गुलाब पुष्प देऊन म्हणजे चे खासदार सदानंद शेठ तानवडे यांनी सत्कार केला.

या सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सावंत गोव्याचे समाज कल्याण मंत्री सुभाष फळ देसाई खासदार सदानंद शेठ तानवडे संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत गोवा प्रदेशाध्यक्ष अनिल पाटील सोलापूर जिल्हा अध्यक्ष सचिन कुलकर्णी उपस्थित होते यावेळी संपादक व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नंदगाव येथील सम्राट शामकांत नागिले यांचे दहावीत घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथील सम्राट शामकांत नागिले यांनी ९१ . ४० टक्के गुण मिळवत घवघवीत यश मिळविले आहे.

सम्राट हा डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल नळदुर्ग चा विध्यार्थी असून तो पत्रकार तथा दलित पॅंथर जिल्हा संपर्क प्रमुख शामकांत नागीले यांचे सुपुत्र आ-हेत.

या बाबत सविस्तर व्रत असे की तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचा गेली पाच वर्षा पासून १०० % शाळेचा निकाल लागत असून याही वर्षी १००% निकाल लागला आहे. याच शाळेत शिकत असलेला विद्यार्थी सम्राट हा नंदगाव येथील पत्रकार तथा दलित पॅंथर जिल्हा संपर्क प्रमुख शामकांत नागिले यांचे सुपुत्र सम्राट नागिले यांनी इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९`..४ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सम्राट नागिले हा डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी असून त्याने कठोर परिश्रम व जिद्दीच्या जोरावर हे यश प्राप्त केले आहे. त्याच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून नातेवाईक, मित्रपरिवार तसेच शिक्षकांकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत. सम्राट नागिले यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## निफाडचा दर्शन सूर्यवंशी यूपीएससी परीक्षेत भारतातून १०२ व्या क्रमांकवर उत्तीर्ण

**विभागीय वन अधिकारी म्हणून निवड**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील दर्शन राजेंद्र सूर्यवंशी याने यूपीएससी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या भारतीय वन सेवा परीक्षेत सुयश मिळवले असून त्याची विभागीय वन अधिकारी म्हणून निवड झाली आहे

यूपीएससीच्या निकालात तो भारतातून १०२ व्या क्रमांकवर ही परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. दर्शन हा अभियांत्रिकी पदवीधारक असून त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण निफाड येथील वैनतेय विद्यालयात झाले आहे. तो इयत्ता ४थी व ७ वीचा स्कॉलरशिप धारक विद्यार्थी असून त्याने इयत्ता दहावीला ९८.५५ टक्के मार्कस मिळावीले होते. शिवाय खोखोच्या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघातून त्याने उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे

त्याने दहावी नंतर मॅकॅनिकल डिप्लोमा व्ही.जे.टी.आय. कॉलेज मुंबई येथून तर बी. ई. मेकेनिकल डिग्री पुणे येथील सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स कॉलेज येथुन पूर्ण केली आहे. यापूर्वी इंटेलिजन्स ब्युरोची परीक्षा पास होऊनही अपेक्षित पोस्ट नसल्याने त्याने ती नोकरी नम्रपणे नाकारली होती. शिवाय तत्पूर्वी देखील ऍसेंचर या मोठ्या आयटी कंपनीने देखील त्याला नोकरी ची ऑफर केली होती.

दर्शनचे वडील राजेंद्र सूर्यवंशी हे वैनतेय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचे निवृत्त प्राध्यापक असून त्याची आई शोभा सूर्यवंशी या जि.प.च्या प्राथमिक शाळेच्या निवृत्त शिक्षिका आहेत.

## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या विद्यार्थिनीने मिळवलं घवघवीत यश शाळेचा १०० % निकाल देऊन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



दिनेश घनघाव/मोखाडा : दिनांक ८ मे २०२६ रोजी डडउ चा ऑनलाईन निकाल जाहीर झाला, हा निकालात अतिशय दुर्गमभागात असलेली शाळा कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय साखरी तालुका मोखाडा, जिल्हा -पालघर ह्या शाळेतील विद्यार्थिनी ने १०० % ने शाळेचा निकाल लावला, त्या बद्दल तालुक्यातून त्यांच कौतुक केल जात आहे, विशेष म्हणजे कित्येक वर्ष ह्या शाळेवर इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी साठी फक्त दोनच शिक्षक शिकवण्या साठी आहेत असे असताना देखील ह्या विद्यार्थिनीने यश मिळवलं, खालच्या ६ ते ८ च्या वर्गातील शिक्षक व ९ ते १० च्या वर्गाच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाने ह्या मुली यश मिळवण्यास यशस्वी ठरल्यात,

घरातील गरीब परिस्थिती त्या परिस्थिती ला मात देत ह्या विद्यार्थिनी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय येथे शिकत आहेत,

घरची परिस्थिती वाईट त्यात काही विद्यार्थिनीना आई वडील नाहीत अशीच विद्यार्थिनी जिने ह्या वर्षी प्रथम येऊन बाजी मारली, गायन खेळ, कला अश्या अनेक गुणाने संपन्न असलेली कुमारी मुक्ता मनोहर वाघ ह्या विद्यार्थिनीने अतिशय मेहनत घेऊन ६७ % मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकवला त्याच बरोबर द्वितीय क्रमांक कुमारी. अंकिता मोहन भोये (६४.२०%) दोन विद्यार्थिनी यांनी तृतीय क्रमांक पटकवला.कुमारी वृषाली शंकर धोडी आणि कुमारी. सुप्रिया भाऊ भोगाडे (६४ %).

पूर्ण शिक्षक उपलब्ध नसताना देखील शाळेचा १०० % निकाल लागल्या मुळे साखरी गावाच्या ग्रामस्थांनी विद्यार्थिनी आणि शिक्षकांचे कौतुक केले.

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १६९ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न**

# सामाजिक कार्याला वेळ दिल्याने नुकसान होत असते, हा गैरसमज : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने तत्व आणि व्यवहाराची सांगड घातली नाही तर वरिष्ठ वर्गाचा नि:पात व्हायला वेळ लागणार नाही. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ७२ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १६९ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे ३ मे २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, कुठलाही भेदभाव न करता समाजात उपलब्ध असणाऱ्या संसाधनाचा समप्रमाणात वाटप केले पाहिजे, जेणेकरून विषमतेची दरी समाप्त होईल. अन्यथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे विषमतेत रक्तरंजित क्रांतीची बीजे असतात, ज्याचा कधीही स्फोट शकतो. तसे होऊ नये म्हणून समतायुक्त समाज निर्माण करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असले पाहिजे. सामाजिक कार्याला वेळ दिल्याने नुकसान होत असते, हा गैरसमज आहे. उलट पक्षी त्यातून निष्पन्न होणाऱ्या एकतेच्या बळावर झाला तर वैयक्तिक व सामाजिक फायदाच होत असतो. करिता समाजाच्या उत्थानासाठी आपण सर्वांनी आवश्यक त्या प्रमाणात आर्थिक व बौद्धिक संसाधने उपलब्ध करून देताना वेळ पण दिला पाहिजे. जेणेकरून समाजात निर्माण झालेल्या कनिष्ठ वर्ग व वरिष्ठ वर्ग यामध्ये रुंदावत चाललेली दरी कमी करता येईल. करिता आपण तत्व आणि व्यवहाराची सांगड घातली नाही तर वरिष्ठ वर्गाचा नि:पात व्हायला वेळ लागणार नाही. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक संदेशाची वर्तमानकालीन प्रासंगिकता समजून घेण्यासाठी चर्चा करीत आहोत. करिता सदरील विषयावर जाणीवपूर्वक कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना सामाजिक कार्यकर्ते ॲड. जी. एन. खंडागळे म्हणाले की, तत्व म्हणजे नेमके काय? न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता हे तत्व विचारात असले तरी दैनंदिन जीवनात व्यवहारातील कृतीत यायला हवे. आर्थिक पाठबळ व सत्ताधारी असणारे लोक यांना वरिष्ठ वर्ग म्हटले पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ड. अशोक उके म्हणाले की, संवैधानिक समूहांना अर्थात एस. सी. च्या १७०३, एस. टी. च्या ८०१ व इतर मागासवर्गीय यांच्या ६७४३ जातीना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रतिनिधित्व बहाल करण्यात आले आहे काय? याची चिकित्सा होणे आवश्यक आहे. तत्त्वाने भारतीय असणाऱ्यांनी जातीयता पाळू नये. क्रांतीचे मारेकरी समाजात आहे ती व्यवस्था कायम ठेवण्यासाठी सातत्याने कार्यरत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची अंमलबजावणी केली तर अनेक समस्यांचे निर्मूलन होऊ शकते. करिता शासन प्रशासकीय व्यवस्थेत आंबेडकराईट विचारधारेची माणसे विराजमान केली पाहिजेत.

याप्रसंगी बोलताना डॉ. कल्पना गंगावणे म्हणाल्या की, सर्वांनीच तत्वनिष्ठ असावे, हे अपेक्षित असले तरी अनेकांची कामे मात्र खोटे बोलल्यानेच होत असतील तर त्यांनी तत्त्वनिष्ठ का असावे? हा त्याच्या समोर अनाकलनीय गंभीर प्रश्न असतो. तसेच ॲड. सुनीलकुमार नागवंश म्हणाले की, तत्व म्हणजे शिस्त होय ज्या आधारे आपल्या जीवनाला आकार प्राप्त होतो. मराठ्यांनी ओबीसीच्या ताटातून घ्यावे. तसेच एससीचे उपवर्गीकरण करून जाती जातीत भांडण लावण्याचे शासक जाती षडयंत्र करीत आहेत. एकेकाळी इंदू, गंगाधर, राजरत्न, रमेश यांच्या निधनानंतर कफन घेण्याएवढी आर्थिक परिस्थिती नसताना पुढील काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या अथक परिश्रमाने समाज मालामाल झाला. मात्र आज समाजाकडे पैसा असला तरी मालामाल झालेल्या व्यक्तीचे समाजाकडे लक्ष नसल्याने पीडितांना गैरसोयीला सामोरे जावे लागते.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक उद्योजक मिलिंद बागुल तर सूत्रसंचालन ॲड. जी. एन. खंडागळे व आभार ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी व्यक्त केले.

# नाथ संमेलनातून जातांना सत् शिष्य बनण्याचा प्रयत्न करावा

## शंकराचार्य सच्चिदानंद अभिनव विद्या नृसिंहभारती यांचे आवाहन







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी/राजेंद्र थोरात : नाशिक आणि निफाड ही नाथांची भूमी आहे

संत ज्ञानेश्वर यांचे गुरू निवृत्तीनाथांची समाधी देखील त्र्यंबकेश्वर येथे आहे,करवीर पिठाचे प्रतिनिधी म्हणून आम्ही नाथ संमेलनाला उपस्थित झालो या. नाथ संमेलनातून जातांना सतशिष्य बनण्याचा प्रयत्न करावा. एकत्र येऊन चिंतन करून संमेलनातून जातांना सनाथ होऊन जाऊ असे आवाहन शंकराचार्य यांच्या वतीने परमहंस परिराजकाचार्या शंकर भारती यांनी केले.

त्र्यंबकेश्वर येथील अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ आणि निफाड येथील श्री स्वामी समर्थ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने निफाड येथे आयोजित राष्ट्रीय नाथ संमेलनाचे उदघाटन भक्तीपूर्व वातावरणात कर्नाटक येथील श्री संस्थान मठ संकेश्वर करवीर पीठ श्री जगद्गुरु शंकराचार्य सच्चिदानंद अभिनव विद्या नृसिंहभारती यांच्या शुभहस्ते भक्तीपूर्व वातावरणात संपन्न झाले.

यावेळी त्रंबकेश्वर गरूपीठाचे चंद्रकांतदादा मोरे,रामप्रभुजी महाराज,शंकर भारती संकेश्वर,राजेंद्रगिरी महाराज,संगम नाथ महाराज,गणेशगिरी महाराज,रामस्वरूप महाराज,सागर महाराज,डॉ.कुशलनाथ मिश्रा, गणेशनाथ महाराज यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

सकाळी शंकराचार्य सच्चिदानंद अभिनव विद्या नृसिंहभारती यांची रथातून मंगलवाद्याच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत नवनाथ वेशभूषा केलेले बालक,नवनाथ मूर्ती आणि कलश घेतलेल्या सुवासिनी व सेवेकरी, नाथ भक्त सहभागी झाले होते.

यावेळी स्वागताध्यक्ष विदा व्यवहारे यांनी प्रास्ताविक मनोगतातून निफाड येथील श्री गुरुदेव नाथांच्या संजीवन समाधीचा इतिहास कथन करून नाथ संमेलनाचा उद्देश याविषयी माहिती दिली.यावेळी त्रंबकेश्वर गुरुपीठाचे चंद्रकांत दादा मोरे यांनी श्री नवनाथांचे कार्य आणि स्वामि सेवा मार्ग याविषयी मार्गदर्शन केले.उदघाटन सोहळ्याला संदीप सुराणा, मिलिंद चवंडके,राजेंद्र राठी,रतनतात्या वडघुले, किरण कापसे,विश्वास कराड,मधुकर राऊत आदींसह मान्यवर उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात गोरक्षनाथ शोध पिठाचे कुशलनाथ मिश्रा यांचे नाथपंथ आणि मतसेन्द्रनाथ ,व सज्जनगड येथील डॉ भूषण स्वामी यांचे नाथ संप्रदाय व समर्थ रामदास या विषयावर व्याख्यान झाले.या सोहळ्याला नाथ भक्त व सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग बांधवांकडून वैद्यकीय अधीक्षक डॉ. एस. एस. तोडकर यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुका महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना वर्ग १ ते ४ चे अध्यक्ष रामकृष्ण जाधव आणि प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे दुधनी शहर अध्यक्ष बसवणपा कोतली यांच्या हस्ते श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. एस. एस. तोडकर यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. तोडकर साहेब दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांची काळजीपूर्वक विचारपूस करून तातडीने सहकार्य करतात. एवढ्या मोठ्या पदावर असूनही त्यांचा स्वभाव मितभाषी आणि मनमिळावू आहे, असे गौरवोद्गार बसवणपा कोतली यांनी यावेळी काढले. दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

या प्रसंगी रुग्णालयाचे वरिष्ठ लिपिक वासिम खान, चंद्रशेखर चितली, रामकृष्ण जाधव आदी उपस्थित होती.

# पंढरपूर तालुका पोलिसांची पोहरगाव व शेगाव येथे अवैध दारू साठ्यावर कारवाई





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक ९ मे २०२६ रोजी पंढरपूर तालुका पोलिसांनी आगामी यात्रा सण उत्सव अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पोहोरगाव शेगाव या ठिकाणी अवैध दारू साठ्यावर रेड करून एकूण पंधरा हजार दोनशे रुपये चा देशी विदेशी दारू साठा जप्त केलेला आहे याबाबत पंढरपूर तालुका पोलिसांनी आरोपीच्या नावे बंडूपासून सय्यद वय ५२ वर्ष राहणार पोहरगाव याच्याविरुद्ध आरोपी नामे नरेश सुरेश दुदम वय ४० वर्षे राहणार शेगाव यांच्याविरुद्ध मुंबई दारूबंदी कलम ६५ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला असून सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री अतुल कुलकर्णी साहेब, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर साहेब माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी गोसावी पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे आबासाहेब शेंडगे पोलीस हवलदार गावडे पोलीस हवालदार सुनील उबाळे सुभाष देशमुख दीपक भोसले पोलीस कॉन्स्टेबल संजय गुटाळ यांच्या पथकाने कारवाई केली आहे.

# ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी मिटविला शेतकऱ्यांचा वाद!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिपक क्षिरसागर/ वाशी प्रतिनिधी : सध्या महसूल विभागामार्फत अनेक नवनवीन योजना राबविल्या जात आहेत. मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना, सलोखा योजना, घरकुलाला मोफत वाळू, जिवंत सातबारा योजना, कुटुंबातील मुद्रांक शुल्क माफ ८५/२ वाटणी योजना,सिंलीग जमीन वर्ग एक करणे, बाबत माहिती, पीक पाहणी अग्रीस्टॉक योजना,याची माहिती शेतकऱ्यांना मिळावी याकरिता समाधान शिबिर आयोजित केले जात आहे. परंतु शेतकरी सध्या खरीपाच्या मशागती करिता आपल्या कामांमध्ये व्यस्त असतो. असाच एक प्रसंग मौजे सारोळा मांडवा येथील शेतकरी कल्याण तुळशीराम दोडके व रमेश भानुदास मोरे, सुरेश भानुदास मोरे, यांचा शेजारील शेतातिल बांध कोरुन टाकला म्हणून वाद-विवाद सुरू होता. वाद एवढा वाढला की दोन्ही शेतकरी पोलीस स्टेशन तक्रार अर्ज करण्याच्या तयारीत होते.मौजे सारोळा मांडवा येथील ग्राम महसूल अधिकारी डि.व्ही.सिरसेवाड पाटील यांनी दोन्ही शेतकऱ्यांमध्ये मध्यस्थी करत सामुपचाराने शेत रस्ता व बांधाबाबत वाद मिटविला. अशाच पद्धतीने कधी जमिनीबाबत तर कधी बांधावर आलेल्या झाडाबाबत अनेक वाद-विवाद सामोपचाराने मिटवितात. त्यामुळे दोन्ही शेतकऱ्यांनी ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या आभार मानले. भर उन्हात सर्वांना समजून सांगून सोबत एकत्र घेऊन चालणारे या ग्राम महसूल अधिकाऱ्याबाबत गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ‘अभंग’ चे यश; आई-वडील नसतानाही प्रतिकूल परिस्थितीत बुंदगे याने मारली बाजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/ज्ञानेश्वर गुरव : नशिबाने दिलेले दुःख बाजूला सारून, केवळ मेहनतीच्या आणि जिद्दीच्या जोरावर यशाला गवसणी घालता येते, हे अभंग अण्णासाहेब बुंदगे या विद्यार्थ्याने सिद्ध केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या परीक्षेत अभंगने ९३.२०% गुण मिळवून समुद्राळ येथील जय स्वामी नारायण विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

**आई-वडिलांचे छत्र हरपले, पण जिद्द कायम**

अभंगची ही यशोगाथा अत्यंत प्रेरणादायी आहे. घरची परिस्थिती बेताची आणि लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपलेले असतानाही अभंगने कधीही हार मानली नाही. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्याने आपले पूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले. त्याच्या या यशाने हे सिद्ध केले की, होतकरू विद्यार्थ्याला संकटे रोखू शकत नाहीत.

अभंगचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, सुपतगाव येथे झाले. प्राथमिक शाळेत असतानाच शिक्षकांनी त्याच्यातील चुणूक ओळखली होती. त्यानंतर माध्यमिक शिक्षणासाठी त्याने समुद्राळ येथील जय स्वामी नारायण विद्यालयात प्रवेश घेतला. त्याने मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

**गावागावातून कौतुकाचा वर्षाव**

अभंगने मिळवलेल्या या यशामुळे समुद्राळ आणि सुपतगाव या दोन्ही गावांचे नाव पंचक्रोशीत



उंचावले आहे. एका गरीब आणि अनाथ विद्यार्थ्याने शून्यातून विश्व निर्माण करत मिळवलेल्या या यशाचे विशेष कौतुक करण्यासाठी दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी व शिक्षणप्रेमींनी त्याचे अभिनंदन केले असून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**अभंग हा अत्यंत कष्टाळू आणि नम्र मुलगा आहे. कौटुंबिक परिस्थिती बिकट असूनही त्याने कधीही अभ्यासात खंड पडू दिला नाही. त्याचे यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ ठरेल.**

**– शिक्षक व ग्रामस्थ.**

### प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवले यश, गावकऱ्यांकडून कौतुकाचा वर्षाव

# शिरोळच्या रोहित धापटेने पोलिस दलात भरारी घेतली; नालंदा बौद्ध विहारात जंगी सत्कार







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विजय शंकर घनघाव/शहापूर : शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर राहिलेल्या शहापूर तालुक्यातील शिरोळ गावाने पुन्हा एकदा आपली चमक दाखवली आहे. बौद्ध, मुस्लिम व आदिवासी समाजबांधव एकोप्याने राहत असलेल्या या गावातील रोहित देवराम धापटे याने जिद्द, चिकाटी व अथक परिश्रमाच्या बळावर महाराष्ट्र पोलिस दलात प्रवेश मिळवला आहे. त्याची मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालयात पोलिस शिपाई म्हणून निवड झाली आहे.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत रोहितचे वडील श्री. देवराम काळू धापटे यांनी मुलाच्या शिक्षणासाठी अहोरात्र कष्ट उपसले. वडिलांच्या कष्टाचे चीज करत रोहितने घरच्या जबाबदारीची जाणीव ठेवून स्पर्धा परीक्षेची तयारी केली. पहिल्याच प्रयत्नात पोलिस भरतीत यश संपादन करत त्याने आई-वडिलांसह संपूर्ण शिरोळ गावाचे नाव उंचावले आहे.

या ऐतिहासिक यशाबद्दल रोहितचा नागरी सत्कार सोहळा आज शिरोळ येथील नालंदा बौद्ध विहारात थाटामाटात पार पडला. प्रबुद्ध ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष श्री. राजेश घनघाव व सचिव श्री. नितीन पवार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन रोहितचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी राजेश घनघाव म्हणाले, रोहितचे यश हे केवळ धापटे कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण शिरोळचे यश आहे. प्रतिकूल परिस्थिती असूनही जिद्द सोडली नाही, तर यश नक्की मिळते, हा संदेश रोहितने आजच्या युवकांना दिला आहे.

या कार्यक्रमास उत्कृष्ट महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.भारतीताई पवार, श्रीकांत पवार, आदर्श घनघाव, संस्कार पवार, अमोल काळे यांच्यासह शिरोळ परिक्षेत्रातील सर्व समाजातील बहुसंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी रोहितच्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या.

रोहितच्या या निवडीमुळे शिरोळ परिसरातील युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण आहे.